# छत्रपती शाहू महाराजांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान

प्रा मनीषा शिवाजी चव्हाण,राज्यशास्त्र विभाग, आर आर पाटील महाविद्यालय सावळज

---

प्रास्ताविक

आधुनिक महाराष्ट्राचे एक उद्धारकर्ते म्हणजे कोल्हापूरचे राजश्री छत्रपती शाहू महाराज होत . प्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांनी पन्नास वर्षाच्या जीवनात स्वतंत्र हिंदवी स्वराज्याची स्थापना केली त्या प्रमाणेच छत्रपती शाहू राजांनी 48 वर्षाच्या जीवनात आधुनिक महाराष्ट्राचा चेहरामोहराच बदलून . छत्रपती शाहू मूळचे राजघराण्यातील नव्हते ते कागलच्या घाडगे घराण्यातील होते. त्यांचा जन्म 26 जुलै 1874 रोजी झाला. त्यांचे मूळ नाव यशवंतराव होते. कागल चे घाशंडगे घराणे विजापूरकरांच्या दरबारात छत्रपती शिवरायांच्या कारकिर्दीत व पेशव्यांच्या काळात असामान्य पराक्रम करण्यासाठी प्रसिद्ध होते. कागलच्या परगणा त्यांना मेहेरनजर म्हणून मिळालेला होता. श्रीमान आबासाहेब घाडगे त्यांचा कोल्हापूरच्या राजघराण्याशी संबंध होता. कोल्हापूरच्या बाबासाहेब महाराज यांच्या मातोश्री अक्कासाहेब महाराज या आबासाहेबांच्या मातोश्री होत. सण1708 मध्ये कोल्हापूरचे स्वतंत्र राज्य स्थापन झाले. कोल्हापूरचे छत्रपती चौथे शिवाजी यांच्या अकाली निधनानंतर कागलचे अधिपती श्रीमंत आबासाहेब यांची रीजंट म्हणून नेमणूक करण्यात आली. हे कार्य करत असताना त्यांनी जमीन महसूल विषयक कामे, शेतीला पाणीपुरवठ्याची सोय, शाळांचे निर्मिती, आर्थिक सहाय्य या कार्यात सक्रिय सहभागी झाले कोल्हापूर संस्थानात शांतता व सुव्यवस्था स्थापन केल्यामुळे त्यांच्याविषयी समाजात विश्वास निर्माण झाला. कोल्हापूर संस्थानचे चौथे शिवाजी महाराज यांचा इंग्रजांनी प्रचंड छळ केला अहमदनगरच्या किल्ल्यात सन1889 सालीनिपुत्रिक मृत्यू झाला. कोल्हापूर संस्थांचा कारभार चालवण्यासाठी दत्तक वारस घेण्याची गरज पडली. छत्रपती चौथे शिवाजी यांच्या पत्नी आनंदीबाई साहेब यांनी कागलच्या बाबासाहेब घाडगे यांचा ज्येष्ठ पुत्र यशवंतराव घाडगे यांना दत्तक घेतले. 17 मार्च 884 रोजी दत्तक विधान झाले. त्यानंतर यशवंतराव हे शाहू महाराज म्हणून ओळखले जाऊ लागले. छत्रपती शाहू महाराजांनी आपल्याला मिळालेल्या सत्ता अधिकाराचा उपयोग संस्थांमधील सामान्य जनतेच्या हितासाठी करण्याचा प्रयत्न केला. जातीवरून निर्माण झालेली सामाजिक विषमता नष्ट करण्याचा प्रयत्न केला. समाजातील दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी बहुजन वर्गाचे नेतृत्व केले. त्यांनी शैक्षणिक सामाजिक व आर्थिक क्षेत्रात सर्वांगीण प्रगती घडवून आणायचे प्रयत्न केला. छत्रपती शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्याप्रमाणेच सामाजिक सुधारणेच्या कार्यात त्यांनी शिक्षणाला प्रमुख स्थान दिले.

कोल्हापूर संस्थानच्या प्रशासनात युरोपीय व भारतीय उच्च मानल्या गेलेल्या जातीचा लोकांमधील अधिकाऱ्यांचा समावेश . बहुजन समाजातील अधिकारी खूप कमी

होते. ही स्थिती सुधारण्यासाठी त्यांनी बहुजन समाजात मोठ्या प्रमाणात शिक्षण प्रसार . शाहू महाराजांनी बहुजन समाजातील शैक्षणिक स्थितीचे अवलोकन केले. तत्कालीन स्थितीत बहुजन समाजात मॅट्रिक उत्तीर्ण झालेल्यांची संख्या खूप कमी होती खेड्यांमध्ये प्राथमिक शाळा नव्हत्या. भारतीय समाज व्यवस्थेमध्ये जे वरिष्ठ ब्राह्मण वर्ग आहे त्यांना फक्त ज्ञानग्रहण करण्याचा अधिकार आहे असा समज समाजात होता .तसेच समाजात प्रचंड अंधश्रद्धा होती अज्ञान होते .ज्ञानाच्या क्षेत्रात ब्राह्मण जातीची मक्तेदारी ब्रिटिशपूर्व काळापासून निर्माण झालेली होती इंग्रजांनी विद्येची प्रवेशद्वारे सर्व जातीसाठी खुली केली. तरीही बहुजन समाजातील असंख्य लोक अज्ञान व दरिद्री जीवन जगत होते. छत्रपती शाहूंनी या अज्ञानी बहुजन समाजात ज्ञानाची ज्योत प्रज्वलित करण्याचा प्रयत्न केला. बहुजन समाजाला स्त्रियांना शिक्षित करण्यासाठी प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत सोय उपलब्ध केली शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली . लढवय्ये, वीर निर्माण करण्यासाठी सक्तीचे व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानला गरज आहे अशी छत्रपती शाहूंची विचारसरणी होती. प्राथमिक शिक्षणाला प्राधान्य, प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करून त्यावर उच्चशिक्षणाची इमारत उभी करण्याचा मानस होता. सन 1913 मध्ये शाहूंनी प्रत्येक गावात एक शाळा असावी ती शाळा त्या गावात बहुसंख्येने राहणाऱ्या जातीच्या व्यक्तीने चालवावी असे त्यांचे मत होते. शिक्षणाविषयी शिक्षकांचा मनात आस्था निर्माण व्हावी व त्याने शिक्षण विषयक चळवळीला गती द्यावी असे महाराजांना वाटत होते परंतु शिक्षकांच्या बाबतीत वतनदारी पद्धत उपयुक्त ठरले नाही. त्यामुळे त्यांनी शिक्षकांची पगारावर नेमणूक करण्याचे सुरू केले सन 1913 च्या आदेशानुसार अनेक खेड्यात मंदिरे चावडी धर्मशाळा या अशा इमारतीतून प्राथमिक शाळा सुरू झाल्या शाळेच्या इमारतीची देखरेखीचे काम गावातील पाटील ,कुलकर्णी व प्रशासनावर सोपविले. बहुजन समाजातील जास्तीत जास्त लोकांना सज्ञान करणे आणि त्यांचा सर्वांगीण विकास करणे यासाठी शाहू महाराजांनी एक प्राथमिक शिक्षणाच्या माध्यमातून पायाभरणी केली. शैक्षणिक प्रसारासाठी महाराजांनी अनेक शिक्षण संस्था व व्यक्तींना आर्थिक मदत केली. त्यामुळेच कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षणाचा मोठ्या प्रमाणात विकास झाला .

बहुजन समाजाचा शेती हा प्रमुख व्यवसाय . या समाजातील लहान मुलांपासून मोठ्या माणसांपर्यंत सर्वजण शेतीमध्ये काम करत असत. तसेच बराच काळ अज्ञानात राहिलेल्या बहुजन समाजाला शिक्षणाचे महत्त्व समजले . म्हणूनच शाहूराजांनी सत्तेच्या शिक्षणाचे धोरण आखले त्याआधी त्यांनी खेड्यापाड्यात फिरून शाळा सुरू करण्यासंदर्भात पाहणी केली .या गावांमधून ताबडतोब शाळा सुरू करण्याचे आदेश दिले देवस्थानच्या उत्पन्नातून नित्य खर्च वगळून राहिलेली रक्कम शाळांना द्यावी असे ठरवले. 25 जुलै 1917 मध्ये शाहूंनी प्राथमिक शाळेत ही माफी ची घोषणा केली. 21 नोव्हेंबर 1917 रोजी काढलेल्या जाहिरनाम्यात कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यात आले .शिक्षणासाठी योग्य वय असलेल्या मुलामुलींना शाळेत पाठवण्यासाठी पालकांवर बंधने

घालण्यात आले. त्यामुळे सक्तीचे व मोफत शिक्षण योजनेला विस्तृत रूप प्राप्त झाले या योजनेमुळे शाळांची संख्या वाढली त्यांनी या शाळा निर्मिती देखभाल उत्पन्न खर्च याबाबत नियम घालून दिलेले होते .शाळांची संख्या वाढली म्हणजे शिक्षकांची संख्या वाढणार याची जाणीव त्यांना होती सन 1918 पासून शिक्षकांची परीक्षा घेण्यास सुरुवात केली यासाठी शिक्षकी पेशा यांसाठी असलेले चांगले वर्तणुकीचा दाखला व पंचवीस च्या आतील वय अशी अट घातली .तसेच सन 1919 मध्ये त्यांनी खास पुरुषांसाठी असलेल्या स्वतंत्र शाळा बंद पडल्या व अस्पृश्यांच्या मुलांना सरकारी शाळेत तुन इतर जातीच्या मुलाप्रमाणेच दाखल करून घ्यावे हे धोरण जाहीर केले.स्त्री शिक्षण बहुजन समाज दलित गोरगरीब बरोबरच स्त्रियांच्या मागासलेपणाची ही जाणीव त्यांना होती. राजाराम महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या स्त्रीयांना फी माफीची सवलत महाराजांनी जाहीर केलेली होती .संस्थानाच्या शिक्षणाधिकारी म्हणून मिस लिटल नंतर त्यांनी श्रीमंत रखमाबाई केळवकर यांची नेमणूक केली .यावरून त्यांचा स्त्री शिक्षण विषयक दृष्टिकोन लक्षात येतो .उच्च व्यवसाय शिक्षण ,प्राथमिक शिक्षणाबरोबरच महाराजांनी माध्यमिक व उच्च शिक्षणाला ही महत्त्व दिले.1881 मध्ये इंग्रजी शाळेचे राजाराम महाविद्यालय मध्ये रूपांतर झाले .आर्य समाजाच्या नियंत्रणाखाली या महाविद्यालयाची प्रगती झाली .प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणाबरोबरच त्यांनी व्यावसायिक शिक्षणाला महत्त्व दिले. गावचा कारभार व्यवस्थित चालावा यासाठी पाटील व तलाठ्यांना प्रशिक्षण देणाऱ्या पाटील स्कूल व तलाठी स्कूल सुरू केले .शिक्षकांसाठी ची प्रशिक्षण केंद्र सुरू केले सहा महिन्याच्या कालावधीत शिक्षकांना अंकगणित भाषा शालेय व्यवस्था अध्यापन पद्धतीचे प्रशिक्षण दिले जात होते .तांत्रिक शिक्षणाची समाजात आवड निर्माण व्हावी यासाठी जयसिंगराव घाडगे टेक्निकल इन्स्टिट्यूट या संस्थेत लोहार काम ,गवंडीकाम, सुतार काम याचे शिक्षण दिले जात असे .त्याचबरोबर लष्करी शिक्षण देणारे इन्फंट्री स्कूल सुरू केले.

विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाची निर्मिती,माध्यमिक तांत्रिक व उच्च शिक्षणाची सोय करूनही अनेक खेड्यातील मुलांना या संधीचा फायदा होत नव्हता .शहरात त्यांच्या राहण्या-जेवण्याची सोय होत नाही. त्याचबरोबर गरिबी आणि जाती यामुळे अडचणी निर्माण होत होत्या .ही समस्या दूर करण्यासाठी त्यांनी कोल्हापुरात वसतिगृहांची निर्मिती करण्याचे धोरण आखले .कोल्हापूर मध्ये विक्टोरिया मराठा बोर्डिंग ,दिगंबर जैन बोर्डिंग ,वीरशैव लिंगायत विद्यार्थी वसतिगृह ,मुस्लिम बोर्डिंग ,नामदेव बोर्डिंग ,बोर्डिंग असे अनेक जातीच्या मुला-मुलींसाठी वसतिगृह उभे केले .कोल्हापुर प्रमाणेच पुणे ,अहमदनगर नागपूर या ठिकाणी ही वसतीगृहे त्यांनी स्थापन केली. कोल्हापुरातील वसतिगृहात गुजरात ,आंध्र ,कर्नाटक ,मध्यप्रदेश या प्रांतातून ही विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी येत असत.

**मूल्यमापन**

छत्रपती शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य बहुमोलाचे आहे. बहुजन समाजातील मुला-मुलींना प्राथमिक माध्यमिक उच्च शिक्षण देणे समाजाला तंत्र शाळा ,लष्करी शाळा, पाटील व तलाठ्यांच्या शाळा इत्यादी सुविधा देणे वसतिगृहांची व्यवस्था करणे असे ध्येय त्यांचे होते

.समाजातील मागासलेपण दूर करून शिक्षणाची गंगा जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे धोरण महाराजांनी ठरवले. छत्रपती शाहूंचे शैक्षणिक कार्याचे सूत्र मक्तेदारी कडून सार्वजनिक ते कळेल खाजगी हितसंबंध कडून सार्वजनिक कल्याण आकडे जातीभेदाने ग्रासलेल्या समाजाला समानतेच्या पातळीवर आणणारे होते.

संदर्भ ग्रंथः-

१. प्राचार्य रातू भगत' राजश्री शाहू छत्रपती: जीवन व शैक्षणिक कार्य
२.प्रा. नानासाहेब, साळुंखे शाहुंच्या आठवणी
३.डॉ. जयसिंगराव पवार ,राजश्री शाहू, कर्मवीर भाऊराव पाटील आणि प्रबोधनकार ठाकरे
४.राजश्री शाहू गौरव ग्रंथ ,महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग सचिवालय मुंबई